-: प्रेसनोट दिनांक - ०५/०७/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक (१) हेमंत नाना कठरे, वय - ४६ वर्षे, पद - विभागीय सह संचालक,(उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग कोल्हापूर वर्ग - १, सद्या रा. प्लॉट नं.३०३, अंबाई डिफेन्स, राउत कॉलनी, कोल्हापूर, मुळ रा.पाचवड, ता. खटाव, जि.सातारा, २) प्रविण शिवाजी गुरव, वय - ३२ वर्षे, पद - उच्च श्रेणी स्टेनोग्राफर, विभागीय सह संचालक,(उच्च शिक्षण) कार्यालय कोल्हापूर विभाग कोल्हापूर वर्ग - २, सद्या रा. शंकर आनंदा गुरव यांचे घरी भाड्याने पिरवाडी, ता. करवीर, जि.कोल्हापूर मुळ रा. महमंदापुर, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर, ३) अनिल दिनकर जौंग, वय - ३४ वर्षे, पद - कनिष्ठ लिपीक, विभागीय सह संचालक,(उच्च शिक्षण) कार्यालय कोल्हापूर विभाग कोल्हापूर वर्ग - ३, रा.राशिवडे, ता. राधानगरी, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तकारदार यांच्या शैक्षणीक संस्थे अंतर्गत नव्याने सुरू करण्यात येणा-या दोन वेगवेगळया हॉटेल मॅनजमेंट कोर्सेस करीता आवश्यक त्या सोयी सुविधा आहेत अगर कसे याची तपासणी करून प्रमाणपत्र देणेसाठी विभागीय सह संचालक,(उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग कोल्हापूर या कार्यालयातील कठरे साहेबांचे पि.ए. गुरव यांनी कठरे साहेबांना ५०,०००/- रूपये द्यायला पाहीजेत त्या शिवाय प्रमाणपत्र मिळणार नाही असे म्हणुन तकारदार यांचेकडे लाच मागणी केली.

दिनांक ०३/०७/२०२३ रोजी तकारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तकार अर्ज दिला. तकारीप्रमाणे दिनांक ०३/०७/२०२३ रोजी, दिनांक ०४/०५/२०२३ रोजी व दिनांक ०५/०७/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तकारदार यांच्या शैक्षणीक संस्थे अंतर्गत सुरू करण्यात येणा-या दोन वेगवेगळया हॉटेल मॅनेजमेंट कोर्सेस करीता आवश्यक त्या सोई सुविधा आहेत अगर कसे याची तपासणी करून प्रमाणपत्र देणेसाठी आरोपी नं. २ यांनी आरोपी नं.१ यांचेसाठी तकारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाच मागणी करून तडजोडी अंती ३०,०००/- रूपये लाच रक्कम आरोप नं.३ यांचेकडे देणेस सांगीतले त्यानंतर आरोपी नं. २ यांनी मागणी केलेली लाच रक्कम आरोपी नं. ०३ यांच्याकडे देणेस सहमती दर्शवल्याचे निषन्न झाले

त्यानंतर दिनांक ०५/०७/२०२३ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता आरोपी कमांक ०१ व ०२ यांनी लाच रक्कम आरोपी क ०३ जौंग यांचेकडे देण्यास सांगीतली. त्याप्रमाणे आरोपी ०३ जौंग यांनी पंच साक्षीदारांचे समक्ष तकारदार यांचेकडुन ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत आरोपी अ.न.०१ ते ०३ यांचेविरूध्द राजारामपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सपोफौ प्रकाश भंडारे, पो.हे.कॉ. विकास माने, पो.हे.कॉ. सुनिल घोसाळकर, पो.कॉ.मयुर देसाई, पो.कॉ. रूपेश माने, पो.कॉ. संदिप पोवार, पोकॉ उदय पाटील ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
४) हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४.
५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned with OKEN Scanner